एसबीसीएन ४२१३११०९
आरबीआय/२००९-१०/२१८
आरपीसीडी.सीओ.आर एफ.बीसी क्र.४२/०७.०८.०१/२००९-१० दि. नोव्हेंबर १३,२००९
सर्व राज्य व केंद्रीय सहकारी बँका
महोदय,

**सेफ डिपॉझिट लॉकर्स**

कृपया आमचे परिपत्रक आरपीसीडी.सोओ.आरएफ.बीसी क्र ९५/०७.३८.०१/२००६-०७ दि.मे १८,२००७ च्या परिच्छेद ५ चा संदर्भ घ्यावा. त्यात बँकाना सांगण्यात आले होते की, लॉकर्सच्या किल्ल्यांची मालकी ओळखता यावी. ह्यासाठी त्या बँक शाखेचा ओळख-संकेत उमटविण्यात (एंबॉस) आला आहे. ह्याची बँकांनी खात्री करुन घ्यावी.

२) आधीच भाड्याने दिल्या गेलेल्या लॉकर्सच्या बाबतीत बँकाना येत असलेल्या प्रत्यक्ष अडचणींचा विचार करता, भारत सरकारच्या वित्तमंत्रालयाच्या सेंट्रल इकॉनॉमिक इंटेलिजन्स ब्युरो, नवी दिल्ली ह्यांनी सुचविले आहे.की ज्यावेळी एखादा लॉकर-धारक तो उघडण्यासाठी बँकेत येईल तेव्हा त्या किल्ल्यांवर बँक/शाखेचा ओळख-संकेत उमटविण्यात यावा. ह्या कामासाठी लॉकरधारकांना टेलिफोन किंवा टपालद्वारेही कळविता येईल.

३) ह्यासाठी आपणास विनंती करण्यात येत आहे की आपण आपल्या शाखांना सूचना द्याव्यात की त्यांनी, लॉकर उघडण्यासाठी ग्राहक बँकेत येईल त्यावेळी त्या किल्ल्यांवर बँक/शाखेचा ओळख-संकेत उमटविण्याबाबतची प्रणाली सुरु करावी. हे काम करण्यासाठी लॉकर तयार करण्याऱ्या कंपनीच्या मदतीने त्या बँक/शाखेमध्ये आवश्यक त्या यंत्राच्या स्थापनेसाठी आपण व्यवस्था करावी.संबधित शाखांनी त्यांच्या लॉकरधारकांना ओळख-संकेत उमटवून घेण्याबाबत कळवावे. असा ओळख संकेत लॉकर धारकाच्या समोरच उमटविला जाईल ह्याची खात्री करुन घ्यावी.

४) ह्याबाबत केलेले अनुपालन आमच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाला कळवावे.

आपला
(आर.सी.सारंगी)
मुख्य महाव्यवस्थापक